**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे    सहसंपादक : तुकाराम कामठे



या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स



संपर्क: 75-59-26-16-75



वर्ष ५ । अंक १९१ । शनिवार १८ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322


**काका ट्रस्ट**
॥ सेवा परमो धर्मः ॥
आयोजित

।। जय श्रीराम ।।

## सस्नेह निमंत्रण

## स्व. अरूणकाका जगताप
**प्रथम स्मृतीदिनानिमित्त**
**विशेष आयोजन**





# रामकथा
# ।। अपने अपने राम ।।



## मा. डॉ. कुमार विश्वास
यांच्या सुमधूर वाणीतून

अहिल्यानगरच्या पावन भूमीत संपन्न होत असलेल्या या ऐतिहासिक रामकथा सोहळ्यास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे. सहकुटूंब सहपरिवार सस्नेह निमंत्रण!

– निमंत्रक –
**श्री. सचिन अरूणकाका जगताप । आ. संग्राम अरूणकाका जगताप**
**काका ट्रस्ट**

**दि. १९, २०, २१ एप्रिल २०२६, वेळ : रोज सायं. ६ ते ९**
कार्यक्रमानंतर सुरूची भोजन व्यवस्था

**ठिकाण – राष्ट्रीय पाठशाळा मैदान, आनंदधाम रोड, अहिल्यानगर**

## दै. आकर्षण निवडक

### नियमबाह्य गॅस गोडाऊनचा धोका; बसपाच्या वतीने तक्रार



अहिल्यानगर- कर्जत तालुक्यातील मौजे राशीन येथे इंडियन गॅसच्या ग्रामीण वितरकांकडून करण्यात येणाऱ्या नियमबाह्य गॅस गोडाऊन व वाहतूक व्यवस्थेमुळे स्थानिक ग्रामस्थांसह जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असल्याची तक्रार बहुजन समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे. संबंधित गॅस वितरकाचा परवाना तात्काळ रद्द करून कठोर कारवाई करावी, अन्यथा २० एप्रिलपासून मुंबई येथील इंडियन ऑईल भवन, बांद्रा कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.कर्जत तालुक्यातील राशीन येथील इंडियन गॅसच्या वितरकांकडून मोठ्या प्रमाणात गॅस वितरण केले जाते. मात्र, या वितरकाने शासनाच्या नियमांचे उल्लंघन करत जिल्हा परिषद शाळेच्या भिंतीलगत मोठ्या प्रमाणावर गॅस टाक्यांचा साठा केल्याचा आरोप आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, प्रशासनातील काही अधिकाऱ्यांशी आर्थिक हितसंबंध जोपासून हे सर्व प्रकार सुरू असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातील काळुबाई देवस्थान परिसरात पूर्वी झालेल्या गॅस स्फोटाच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी दत्तात्रय आत्माराम सोनवणे यांनी यापूर्वीही तक्रार केली होती. ग्रामस्थांच्या आणि शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता.मात्र, त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. यामुळे संतप्त झालेल्या बहुजन समाज पार्टी व अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने ७ जानेवारी रोजी निवेदन देऊन २३ जानेवारीपासून सात दिवस बेमुदत उपोषणही केले होते राशीन परिसरात सुमारे ५००० लोकसंख्या वास्तव्यास असून, गॅस गोडाऊन शाळेलगत असल्याने भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित गॅस वितरकाचा परवाना तात्काळ रद्द करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन केंद्रीय पेट्रोलियम, नैसर्गिक वायू मंत्री, इंडियन गॅसचे चेअरमन आणि जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यासह संबंधित विभागांना पाठविण्यात आले आहे.

### तमाशा कलावंतांवर अमानुष हल्ल्याचा दिव्यांग निराधार संघर्ष समितीच्या वतीने निषेध

अहिल्यानगर- पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथे आयोजित करण्यात आलेल्या यात्रोत्सवात तमाशा कलावंतांवर झालेल्या अमानुष हल्ल्याचा राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समितीच्या वतीने निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणातील दोषींवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी केली आहे. तसेच, कारवाई करण्यात विलंब झाल्यास संघटनेच्या माध्यमातून राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या तमाशा आणि लावणीसारख्या लोककलेवर गेल्या काही काळात वारंवार हल्ले होत असल्याचे चित्र दिसत आहे. वडगाव सावताळ येथील बनाईदेवी यात्रोत्सवात कलावंतांना मारहाण करण्यात आली, तसेच महिला कलाकारांशी विटंबनाही करण्यात आली. ही घटना अत्यंत संतापजनक असून, अशा प्रकारच्या घटना आता सातत्याने घडत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.याच पार्श्वभूमीवर १ एप्रिल रोजी संगमनेर तालुक्यातील पुणे-नाशिक महामार्गावरील वरूडी फाटा येथेही एक धक्कादायक प्रकार घडला होता. एका वाहनचालकाने तमाशा फडाच्या गाड्यांना अडवून कलावंतांना बेदम मारहाण केली होती.

### देविदास कुलकर्णी यांचे निधन

अहिल्यानगर : येथील सावेडी भागातील चैतन्य



बॅटरी व सोलर तसेच चैतन्य ट्रॅव्हल्सचे संचालक शिरीष कुलकर्णी यांचे वडील देविदास नारायण कुलकर्णी (वय ८०) यांचे अल्प आजाराने १५ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन विवाहित मुले, विवाहित कन्या, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# गुणवंतांचा गौरव : श्री चैतन्य टेक्नो विद्यालयात दहावीच्या 'टॉप १०' विद्यार्थ्यांचा उत्साहात सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दहावीच्या बोर्ड परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करण्यासाठी जाधव नगर, नगर–कल्याण रोड येथील उद्धव अकॅडेमी संचालित श्री चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये विशेष सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी इयत्ता दहावीतील 'टॉप १०' गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला उद्धव अकॅडेमीच्या माजी प्राचार्या सौ. निशिता जयंत जाधव तसेच सचिव ॲड. जयंत मच्छिन्द्रनाथ जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेच्या प्राचार्या के. अन्सी मॅडम, डीन के. सुमन सर, शाखा विस्तार अधिकारी शशी कुमार सर, समन्वयिका सौ. पायल खंडेलवाल, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव करत त्यांच्या यशामागील शिक्षकांचे परिश्रम व पालकांचे सहकार्य अधोरेखित केले. शाळेचा १०० टक्के निकाल कायम राखल्याबद्दलही समाधान व्यक्त करण्यात आले. सौ. निशिता जाधव यांनी प्राचार्या, डीन व शिक्षकवृंद यांच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशीच यशस्वी वाटचाल कायम ठेवावी, असा विश्वास व्यक्त केला.

पालकांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांच्या यशामागे शाळेचा मोलाचा वाटा असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांनीही आपले अनुभव सांगत शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच सर्वांगीण विकास साधणाऱ्या या शाळेने अहिल्यानगर शहरात आपला ठसा उमटविल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

गुणवंत विद्यार्थ्यांची नामावली :

या सत्कार सोहळ्यात स्नेहांशु संतोष दोमल (४९६ गुण, ९९.२०%), अनम अप्सर पठाण (४९४ गुण, ९८.८०%), कन्हैय्या दिलीप अव्हाड (४८९ गुण, ९७.८०%), आयुष सोमनाथ मोरे, कार्तिकेय प्रशांत दरवाडे व श्रावणी भाऊसाहेब चाबुकस्वार (प्रत्येकी ४८७ गुण, ९७.४०%), पृथ्वीराज अरुण पाळवे (४८५ गुण, ९७.००%), तनमय नानासाहेब कांबळे (४८४ गुण) तसेच साई विजय भुसारे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शाळेच्या शिक्षकांनी केले. संपूर्ण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# विद्यार्थी,शिक्षक यांच्या परिश्रमामुळे संस्थेचा नावलौकिक वाढला – रामकिसन देशमुख

**प्रा.अनुराधा चव्हाण यांना मिळालेल्या पीएच.डी.पदवीबद्दल सन्मान**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आमचे आधारस्तंभ स्व.डॉ.नाथ पाऊलबुधे यांनी ज्या उद्देशाने संस्थेची उभारणी केली,शैक्षणिक कार्य करताना सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे या हेतूने शाळा सुरू केली, त्यांचा उद्देश सफल झाला.आमच्या शाळेतील विद्यार्थी, शिक्षकांनी परिश्रम घेऊन शैक्षणिक क्षेत्रात चांगले विद्यार्थी घडविले, अशा शिक्षकांना पीएचडी पदवी प्राप्त झाली. विद्यार्थी व शिक्षक यांच्या परिश्रमामुळे सेवा शिक्षण प्रसारक संस्था नावारूपास आली. ही कौतुकास्पद बाब आहे.असे प्रतिपादन सचिव रामकिसन देशमुख यांनी केले.

अहिल्यानगर येथील वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन.जे.पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी येथील डी.फार्म अभ्यासक्रमाच्या प्राचार्या प्रा. अनुराधा चव्हाण यांना औषध निर्माणशास्त्र या विषयात पीएच.डी.पदवी प्रदान करण्यात आली आहे. निमित्त त्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.




यावेळी सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, बी फार्म विभागाचे प्राचार्य डॉ.श्याम पंगा, प्राचार्य सुचित्रा डावरे, विजया नवले, सविता सानप, अनिता सिद्धम, डॉ.वेणू कोला, डॉ. प्रसाद घुगरकर, डॉ.रोशनी सूर्यवंशी, डॉ.विजय तारडे, सौ. स्वाती कडनोर आदी उपस्थित होते. प्रा.अनुराधा चव्हाण यांनी " कंपॅरेटिव्ह स्टॅण्डर्डाइझेशन अँड फार्माकोकायनेटिक स्टडी ऑफ कॅव्हेन्व्हेंशनल हर्बल एक्सट्रॅक्ट अँड देयर नॉवेल फॉर्म्युलेशन " या विषयावर सखोल संशोधन पूर्ण केले आहे.

ही पदवी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्न संशोधन केंद्र, शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी.पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर येथून संपादन केली. त्यांच्या संशोधन कार्यासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ.अनिलकुमार उत्तमचंद ताटिया यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. प्रा.चव्हाण यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी प्रा.अनुराधा चव्हाण यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# आनंदधाम येथे आनंद बाल संस्कार शिबिराचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांनी कायम नवीन पिढीला संस्कारीत करण्याचा, त्यांच्यात नीतिमूल्ये रूजवण्याचा आग्रह धरला. याच शिकवणुकीनुसार शिक्षा आणि संस्कार देऊन मुलांच्या जीवनाला सुंदर आकार देण्याचा उद्देश समोर ठेवून आनंदधाम येथे आनंद संस्कार शिक्षा अभियान अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. याअंतर्गत याही वर्षी उन्हाळी आनंद बाल संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. दि. १ ते ६ मे २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ७ ते ११ यावेळेत हे शिबिर होणार आहे. इयत्ता ते दहावी पर्यंतचे मुले मुली यात सहभागी होऊ शकतील, अशी माहिती अभियान प्रमुख सरोज कटारिया यांनी



दिली.

शिबिरात मुलांना शारीरिक व्यायाम, प्रार्थना, जैन तत्त्वज्ञानाची शिकवण तसेच ब्रेन ॲक्टिव्हिटी यांचा समावेश आहे. मुले मुलींना सकाळच्या नाश्त्याची न्याहारीची सोय केलेली असते. त्यायोगे मुले सहभोजनातून अनेक चांगल्या शिकवणी आत्मसात करत असतात.

आताच्या काळात मुलांवर सोशल मीडियाचा, इंटरनेटचा प्रभाव वाढला असला तरी सुटीच्या काळात त्यांना सोशल मिडिया पासून दूर ठेवत मोकळ्या वातावरणात शिक्षा आणि संस्कार मिळण्यासाठी हे शिबिर महत्त्वाचे आहे. मुलांमध्ये संघटन कौशल्य, नेतृत्व गुण, संवाद कौशल्य, धार्मिक संस्कार, नीतिमूल्ये, परस्पर संवाद, नियमित व्यायामाचे महत्त्व रूजण्यास शिबिरामुळे मदत होईल. तरी जास्तीत जास्त पालकांनी आपल्या पाल्यांना शिबिरात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे असे आवाहन सरोज कटारिया यांनी केले आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क : ७५८८६९६०७८, ८२०८३०१९२८, ९८९००२५८११.

# अहिल्यानगर जिल्ह्यात 'सामाजिक समता सप्ताह' उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या समतादूत प्रकल्पांतर्गत तसेच सहायक आयुक्त, समाजकल्याण अहिल्यानगर यांच्या मार्फत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ८ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान 'सामाजिक समता सप्ताह' विविध उपक्रमांनी साजरा केला जात आहे.

या सप्ताहाचा उद्घाटन सोहळा ८ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संपन्न झाला. सप्ताहभर पथनाट्याच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती, संत गाडगेबाबा महाराज व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम, विविध स्पर्धा तसेच प्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर उपक्रम समाजकल्याण आयुक्त तथा महासंचालक श्रीमती दीपा मुधोळ, निबंधक डॉ. सुचिता शिंदे, विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड तसेच सहायक आयुक्त प्रविण कोरंगटिवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असल्याची माहिती बार्टीचे प्रकल्प अधिकारी दिलावर सय्यद यांनी दिली.

याच अनुषंगाने श्रीरामपूर शहरात समतादूत, कामगार हॉस्पिटलचे सेवा नर्सिंग महाविद्यालय यांचे विद्यार्थी व शिक्षकांच्या सहकार्याने पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले. सी.डी. जैन महाविद्यालय, सेंट लुक नर्सिंग कॉलेज व सेवा नर्सिंग महाविद्यालय येथे पथनाट्याद्वारे विविध शासकीय योजनांची प्रभावी जनजागृती करण्यात आली. यावेळी बार्टीचे संशोधन अधिकारी दिलावर सय्यद, सेवा नर्सिंगचे प्राचार्य शेख सर, मुसमाडे सर, प्रज्ञा गायकवाड मॅडम, सी.डी. जैनचे उपप्राचार्य सय्यद सर, वाडनकर सर, समतादूत पिरजादे एजाज तसेच सेंट लुकचे प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, सामाजिक समता सप्ताह अंतर्गत महात्मा फुले जयंती व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पंचायत समिती, राहुरी येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व संविधान उद्देशिकेचे वाचन करून करण्यात आली.

**शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी अहिल्यानगरमध्ये आंदोलन**

# शिक्षकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष थांबवा, अन्यथा तीव्र आंदोलन उभारू - प्रा. अंबादास शिंदे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष आणि अक्षम्य असंवेदनशीलतेच्या निषेधार्थ शिक्षक सेनेच्या वतीने शिक्षण अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात आले. यावेळी शिक्षकांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाचे लक्ष वेधले.

या आंदोलनाचे नेतृत्व शिक्षक सेना जिल्हाप्रमुख प्राध्यापक अंबादास शिंदे यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक सेना पदाधिकारी आणि जिल्ह्यातील अनेक शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान विविध मागण्यांचे निवेदन शिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आले.

शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांमध्ये अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, थकित देयके तातडीने देणे, बी.एल.ओ.सारख्या अशैक्षणिक कामांपासून शिक्षकांना मुक्त करणे, परीक्षा काळातील पट पडताळणीची योग्य व्यवस्था, संच मान्यतेतील त्रुटी दूर करणे, मासिक वेतनातील विलंब थांबवणे, विनाअनुदानित शाळांचे स्वयंअर्थसाहाय्यीत



शाळांमध्ये रूपांतर, दुबार पाळीतील रात्रशाळा शिक्षकांचे वेतन तसेच सी.एच.बी. शिक्षकांच्या वेतनवाढीचा प्रश्न यांचा समावेश होता.

यावेळी प्रा. अंबादास शिंदे यांनी आपल्या भाषणात प्रशासनावर तीव्र शब्दांत टीका करत शिक्षकांच्या व्यथा मांडल्या. ते म्हणाले, "शिक्षक हा समाजाचा कणा असूनही आज त्यालाच मूलभूत हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे लागत आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. शासनाने शिक्षकांच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. आमच्या संयमाची परीक्षा घेऊ नये, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल."

पुढे ते म्हणाले, "शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा टाकून शिक्षण व्यवस्थेचा दर्जा खालावत आहे. शिक्षकांना त्यांच्या मूळ कामावर लक्ष केंद्रित करता यावे, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. प्रलंबित देयके आणि वेतनातील विलंब हा शिक्षकांच्या सन्मानाला धक्का देणारा प्रकार आहे. यावर त्वरित तोडगा न निघाल्यास राज्यभर मोठे आंदोलन उभारले जाईल."

या आंदोलनात शिक्षक सेना जिल्हा सचिव उद्धवराव सोनवणे, उपाध्यक्ष महेश कुलकर्णी, कार्याध्यक्ष रावसाहेब मस्के, विठ्ठलराव उरमूडे, शिक्षक नेते अविनाश साठे, शेख सर, प्रसाद शिंदे, बापू दुधाटे, सोमनाथ नजन, दिगंबर हरवा, नंदकुमार जाधव, अर्जुन आढाव, कोतकर सर, शिंदे सर, संकेत मस्के, रामलाल कर्डिले, विनायक आहेर, अजिंक्य गायकवाड, गणेश पोटभरे, तसेच युवा सेना उपजिल्हाप्रमुख महेश शेळके आदींसह बहुसंख्य शिक्षक उपस्थित होते.

आंदोलन शांततेत पार पडले असून, दिलेल्या निवेदनावर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी शिक्षकांनी व्यक्त केली.

# नाणेगाव शिवारात गौण खनिज चोरीचा धुमाकूळ; महसूल विभागावर गंभीर आरोप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तालुक्यातील नाणेगाव शिवारात मागील काही दिवसांपासून गौण खनिज चोरांनी अक्षरशः धुमाकूळ घातल्याचे चित्र समोर येत आहे. दिवसाढवळ्या सुरू असलेल्या या बेकायदेशीर उत्खननामुळे महसूल विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, वाळू व इतर गौण खनिजांची चोरी मोठ्या प्रमाणात सुरू असून, याकडे संबंधित यंत्रणा डोळेझाक करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, ही संपूर्ण कारवाई महसूल विभागाच्या नाकावर टिच्चून सुरू असल्याने प्रशासनाच्या निष्क्रियतेबद्दल नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी जबाबदार तलाठी, मंडल अधिकारी तसेच पैठण तहसील कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्याचा गंभीर आरोपही स्थानिकांनी केला आहे. लाखो रुपयांच्या महसुलाचा फटका शासनाला बसत असताना अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. दरम्यान, या प्रकाराकडे तातडीने लक्ष देऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, तसेच बेकायदेशीर उत्खनन थांबवावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे.

# गौतम पब्लिक स्कूलच्या प्रवेश प्रक्रियेला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता १ली ते ८वी या वर्गांसाठी प्रवेश प्रक्रियेनिमित्त राज्यातील विविध जिल्ह्यांमधून पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे शाळेच्या परिसरात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

दरवर्षीप्रमाणे यंदाही १४ एप्रिल, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून एकदिवसीय प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. प्रवेश प्रक्रियेच्या प्रारंभी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रवेश प्रक्रियेदरम्यान पालकांसाठी चहा–नाश्ता व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण प्रक्रिया अत्यंत



नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आल्यामुळे पालकांनी समाधान व्यक्त केले. प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे, कोणत्याही प्रकारची जाहिरात न करता केवळ गुणवत्तेच्या जोरावर विद्यार्थ्यांना आकर्षित करणारी गौतम पब्लिक स्कूल ही महाराष्ट्रातील एक वेगळी ओळख निर्माण करणारी शाळा ठरली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गौतम परिवार कटिबद्ध असल्याचे प्राचार्य नूर शेख यांनी सांगितले. या प्रसंगी संस्थेचे चेअरमन तथा माजी आमदार अशोकरावजी काळे, विश्वस्त तथा आमदार आशुतोष काळे, सचिव चैताली काळे, निरीक्षक नारायण बारे, प्राचार्य नूर शेख आदी मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले तसेच आभार व्यक्त केले. ही प्रवेश प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक, हाऊसमास्टर, शिक्षक व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरमध्ये २८ एप्रिल रोजी निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन



अहिल्यानगर- तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने शहरात मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील युवक-युवतींना योग्य जोडीदार मिळावा आणि विवाह प्रक्रियेला सुलभता यावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय कांबळे व वधू-वर समिती प्रमुख अशोक बागुल यांनी केले आहे. हा वधू-वर परिचय मेळावा न्यू टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आयोजित करण्यात आला आहे. दुपारी १ वाजता उद्घाटन सत्रानंतर वधू-वर परिचय मेळाव्याला प्रारंभ होणार असून त्यामध्ये सहभागी युवक-युवतींना एकमेकांची ओळख करून देण्यात येणार आहे. या मेळाव्यात बौद्ध समाजातील अविवाहित युवक-युवतींसह घटस्फोटीत तसेच विधुर व्यक्तींचीही नोंदणी केली जाणार आहे. विवाहासाठी इच्छुक असलेल्या कुटुंबांना एकाच ठिकाणी एकमेकांची माहिती मिळावी आणि संवाद साधता यावा, यासाठी हा मेळावा उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.सहभागी होणाऱ्या युवक-युवतींच्या पालकांनी आपल्या मुला-मुलींचा बायोडाटा व फोटो सोबत घेऊन उपस्थित राहावे, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे. तसेच मेळाव्याबाबत अधिक माहिती किंवा नोंदणीसाठी संजय कांबळे (मो. ९९७०७७५५२२) व अशोक बागुल (मो. ९८८१८२७८९२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### भीम गीतांनी पंचशील नगर दुमदुमले; बोधिसत्व प्रतिष्ठानच्या आयोजनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अहिल्यानगर - महामानव ४६३५

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त देशभरात तसेच विदेशात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याच अनुषंगाने भिंगार शहरातही जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पंचशील नगर येथे बोधिसत्व प्रतिष्ठानच्या वतीने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे व विशाल चव्हाण यांच्या भव्य भीम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून बौद्ध वंदना घेण्यात आली. त्यानंतर भिंगार शहराचा बुलंद आवाज म्हणून ओळखले जाणारे कालकथित पँथर एकनाथ उर्फ नाथा भिंगारदिवे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. यानंतर भीम गीतांच्या कार्यक्रमास सुरुवात होताच वातावरण भारावून गेले.या कार्यक्रमासाठी वृद्ध, तरुण, महिला तसेच लहान मुलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमाला ज्येष्ठ कार्यकर्ते प्रसाद भिंगारदिवे, सुदर्शन भिंगारदिवे, सुनील भिंगारदिवे, प्रा. सुहास धिवर, ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, नगरसेवक सुरेशभाऊ बनसोडे, प्रा. जयंत गायकवाड, देशस्तंभ न्यूजचे महेश भोसले, नगरसेवक मयूर बांगरे, आरपीआयचे शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुमेध गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे सिद्धार्थ आढाव, अक्षय भिंगारदिवे, संदीप पारधे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बोधिसत्व प्रतिष्ठान पंचशील नगरचे अध्यक्ष आशिष भिंगारदिवे, उपाध्यक्ष सोनू थोरात, कार्याध्यक्ष अजिंक्य भिंगारदिवे, सचिव पंकज शेलकर, खजिनदार अजय शिंदे तसेच रामदास भिंगारदिवे, संतोष धिवर, संदीप थोरात, सनथ भिंगारदिवे, मयूर भिंगारदिवे, विकी बोरगे, अनिरुद्ध भिंगारदिवे, प्रज्वल पवार, निकेतन शिरसाट, भाग्येश बोराडे, किरण गायकवाड, सुमीत भिंगारदिवे, श्रेयस गायकवाड, हर्षल गायकवाड, यश गायकवाड, सोमनाथ भिंगारदिवे, रुतीक धिवर, आदित्य गजभिव, शुभम मिसाळ, रोहन सदाफुले, शिवम वावरे, योगेश आंग्रे, सोहम उबाळे, रोहन उबाळे, सार्थक धिवर, आदित्य कदम, उत्कर्ष धिवर आदींनी परिश्रम घेतले.

## रेशनकार्ड, ऑनलाइन प्रक्रिया आणि गॅस पुरवठा गतिशील करा - रामदास फुले

**अन्न व नागरी पुरवठा मंत्री भुजबळ यांना निवेदन**
**रेशनकार्डची कामे रखडल्यामुळे गोरगरीब धान्यापासून वंचित**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** गोरगरीब व वंचित नागरिकांना शासनाच्या शिधा धान्याचा नियमित लाभ मिळावा, यासाठी रेशनकार्ड व ऑनलाईन प्रक्रियेमधील अडथळे तात्काळ दूर करून ती प्रक्रिया गतीमान व पारदर्शक करावी, तसेच जिल्ह्यात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही वितरणात होत असलेल्या गोंधळावर नियंत्रण आणून व्यवस्था सुरळीत करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मंत्री भुजबळ शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आले असता रामदास फुले यांनी त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन हे निवेदन दिले. यावेळी त्यांनी पुरवठा विभागातील विविध त्रुटींकडे लक्ष वेधत सामान्य नागरिकांना भेडसावत असलेल्या अडचणींचा सविस्तर आढावा मांडला.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अहिल्यानगर जिल्ह्यासह तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांची रेशनकार्ड नोंदणी अद्याप पूर्ण झालेली नाही. काही नागरिकांच्या रेशनकार्डवर धान्य वितरण रखडलेले असून, अनेकांना त्यांचा हक्काचा शिधा वेळेवर मिळत नाही. रेशनकार्डसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू असून, अर्ज महिनोमहिने प्रलंबित राहतात. परिणामी, नागरिकांना खासगी एजंटकडे जावे लागते, अन्यथा त्यांचे काम मार्गी लागत नाही. या परिस्थितीमुळे गोरगरीब व गरजू कुटुंबांना अन्नधान्यापासून वंचित राहावे लागत असल्याची गंभीर बाब फुले यांनी अधोरेखित केली आहे.

## लव्ह,लँड आणि कॉर्पोरेट जिहादविरुद्ध अहिल्यानगरमध्ये विश्व हिंदू परिषद व बजरंग दल आक्रमक

**दिल्लीगेट येथे जोरदार निदर्शने**





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नाशिक आणि अमरावतीमध्ये हिंदू मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनांमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून,याचे पडसाद आता अहिल्यानगरमध्ये तीव्रतेने उमटू लागले आहेत. लव्ह जिहाद, लँड जिहाद आणि कॉर्पोरेट जिहादच्या वाढत्या घटनांचा निषेध करण्यासाठी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने आरपारच्या लढाईची हाक दिली आहे.हिंदूंच्या संयमाचा अंत पाहणाऱ्यांना आता हिंदूंमधील विराट रूप दाखवण्याची वेळ आली आहे,'' अशा कडक शब्दांत आयोजकांनी आपला पवित्रा स्पष्ट केला आहे.हिंदूंच्या संयमाचा अंत पाहणाऱ्यांना आता हिंदूंमधील विराट रूप दाखवण्याची वेळ आली आहे,'' अशा कडक शब्दांत बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी यांनी आपला पवित्रा स्पष्ट केला आहे.दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी.अन्यथा बजरंग दल मोठे आंदोलन उभे करेल.असा इशारा देण्यात आला आहे.

तसेच धर्मांतरण विरोधी कायदा ताबडतोब करण्यात यावा.अशी मागणी बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी यांनी केली आहे. नाशिकमधील कॉर्पोरेट क्षेत्रातील शोषण आणि अमरावतीमधील रॅकेट यावर समाजात मोठा संताप व्यक्त होत आहे. दिल्लीगेट येथे विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे वतीने जोरदार निदर्शने करून निषेध व्यक्त करण्यात आला.याप्रसंगी बजरंगदल राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी,विश्व हिंदू परिषदेचे विभाग मंत्री सुनील खिस्ती,जिल्हा मंत्री अनिल जोशी,जिल्हा सह मंत्री राजेंद्र चुंबळकर, प्रांत गोरक्षा सदस्य ऋषिकेश भागवत,विभाग संयोजक कुलदीप ठाकूर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर, गजेंद्र सोनवणे,जिल्हा संयोजक सोमनाथ चितळे, अमर सैंदर, अजिंक्य नांगरे, ओंकार गाडेकर, विरेंद्र शिंदे, रोहित पोकळे, मंथन डागवाले, दिनेश हिरगुडे, रोहन जगताप,सागर भंडारी,सतीश नाना मोरे,निशांत गोंधळी,अजय दराडे, आभी पाटील,सागर भांबरे, मनोज फुलारी, संतोष पवार ,उत्कर्ष गीते,दिनेश हिरगुडे आदी उपस्थित होते.

## संत ज्ञानेश्वर उद्यानात पर्यटकांची गर्दी; पैठण बाजारपेठेला मिळाली नवी चालना



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** संत ज्ञानेश्वर उद्यान पुन्हा सुरू झाल्यानंतर येथे पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, त्याचा थेट परिणाम पैठणच्या बाजारपेठेवर दिसून येत आहे. तब्बल दहा वर्षांनंतर पुन्हा सुरू झालेल्या या उद्यानाने शहरातील पर्यटनाला नवी उभारी दिली आहे.

उद्यानातील आकर्षक संगीतमय जलकारंजे आणि लेझर शो हे पर्यटकांचे मुख्य आकर्षण ठरत आहेत. रात्रीच्या वेळेस रंगीबेरंगी प्रकाशात सादर होणारा हा शो पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक उपस्थित राहतात. दरम्यान, या प्रकल्पासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला असून पहिल्या टप्प्यातील कामे पूर्ण झाली आहेत. वर्षभरात लाखो पर्यटकांनी येथे भेट दिली असून, तिकीट विक्रीतून मोठा महसूलही मिळाला आहे.

उद्यानाच्या दुसऱ्या टप्प्यात विविध आधुनिक सुविधा उभारल्या जाणार आहेत. यामध्ये फूड कोर्ट, गेम झोन, सेल्फी पॉइंट, स्केटिंग रिंग, टुरिस्ट हाऊस, सेंट्रल व्हिस्टा, वॉटर पार्क, लँडस्केप गार्डन यांसारख्या आकर्षणांचा समावेश आहे.

तसेच, पर्यटकांच्या सोयीसाठी नवीन पार्किंग व्यवस्था व इतर मूलभूत सुविधा विकसित करण्यात येत आहेत. त्यामुळे आगामी काळात पैठण शहर पर्यटनाच्या नकाशावर अधिक ठळकपणे झळकणार आहे.

## शिक्षण क्षेत्रातील समस्यांबाबत आंदोलनाचा आ. सत्यजित तांबे यांचा इशारा

**शिक्षण थांबलय, प्रशासन सांगूनही झोपलंय; आता आंदोलन होणारच**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्रातील शालेय शिक्षण व्यवस्था आज कोलमडण्याच्या मार्गावर आहे. शिक्षकांना शिकवण्याऐवजी सर्वेक्षण, नोंदी आणि इतर कामांमध्ये अडकवले जात आहे. प्रशासनाकडून ना स्पष्ट धोरण, ना ठोस निर्णय आणि याची किंमत थेट विद्यार्थ्यांना मोजावी लागते आहे.

या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण आयुक्तांना पत्राद्वारे शिक्षण क्षेत्रातील विविध प्रलंबित मागण्यांबाबत तातडीने बैठक आयोजित करण्याची मागणी केली. २००७ पासून शिक्षणाच्या प्रश्नांवर माझा सातत्याने लढा सुरू आहे. अनेक वेळा प्रत्यक्ष भेटून आणि लेखी स्वरूपात प्रश्न मांडले, पण अजूनही दीर्घकालीन उपाययोजना झालेल्या नाहीत. हे केवळ दुर्लक्ष नाही, तर शिक्षण व्यवस्थेशी खेळ आहे.

उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर येथील प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी, शिक्षक संघटना, संस्थाचालक, विद्यार्थी व पालक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत तात्काळ संयुक्त बैठक घेऊन ठोस निर्णय घ्यावेत, ही स्पष्ट मागणी आहे. अन्यथा, २५ मे २०२६ पासून मी स्वतः बेमुदत आंदोलनास बसणार आहे. प्रश्न सुटेपर्यंत मागे हटणार नाही. आंदोलन, गुन्हे आणि दबाव; हे माझ्यासाठी नवीन नाही. दिल्लीपासून मुंबईपर्यंत अशा अनेक लढ्यांना सामोरे गेलो आहे. शिक्षण हा प्रयोगाचा विषय नाही. विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात घालणाऱ्यांना आता उत्तर द्यावेच लागेल. निर्णय घ्या, नाहीतर आंदोलन अटळ आहे!

## सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना आजीवन फ्री पास; दीर्घ लढ्याला अखेर यश

**अहिल्यानगरमध्ये पार पडला विजयी मेळावा । संघटनेच्या एकजुटीच्या बळावर आणि सभासदांच्या ताकदीवर लढा यशस्वी – बलभीम कुबडे**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना आजीवन मोफत प्रवासाचा पास मिळावा, या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीला अखेर यश मिळाले असून, एसटी महामंडळाने ही मागणी मान्य केली आहे. सेवानिवृत्त एसटी कर्मचारी संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याने राज्यभरातील हजारो कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर विभागाच्या वतीने जेऊर बायजाबाई (ता. नगर) येथे विजयी मेळावा उत्साहात पार पडला. संघटनेचे केंद्रीय सदस्य बलभीम कुबडे यांच्या अध्यक्षतेखाली हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. मेळाव्यात कार्याध्यक्ष अर्जुनराव बकरे, राज्यस्तरीय पदाधिकारी व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बलभीम कुबडे यांचा अभिनंदन ठराव मांडण्यात आला. या ठरावाला गोरख बेळगे यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सदस्यांनी

राज्यस्तरीय पदाधिकारी व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य यांचे अभिनंदन ठराव टाळ्यांच्या कडकडाटात एकमताने मंजूर केला.

यावेळी बोलताना बलभीम कुबडे यांनी सांगितले की, ''संघटनेच्या एकजुटीच्या बळावर आणि सभासदांच्या ताकदीवर हा लढा यशस्वी झाला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मागणी अखेर पूर्ण झाली असून, यामुळे राज्यातील सुमारे ४६ हजार सेवानिवृत्त एसटी कर्मचारी, त्यांचे पती-पत्नी तसेच विधवा महिलांना वर्षभर मोफत एसटी प्रवासाचा लाभ मिळणार आहे.''

पूर्वी १९९६ पासून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दोन महिने, सहा महिने किंवा नऊ महिन्यांच्या कालावधीसाठीच मोफत पास दिला जात होता. मात्र, हा पास कायमस्वरूपी (१२ महिने) मिळावा, अशी मागणी अनेक वर्षांपासून सातत्याने केली जात होती. अखेर शासन आणि परिवहन मंडळाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

या प्रसंगी ज्ञानदेव अकोलकर, शिवाजी कडूस, अरुण दळवी यांनी संघटनेच्या कामकाजावर विश्वास व्यक्त करत कामगारांच्या प्रश्नांसाठी आवश्यक तेव्हा आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचे आश्वासन दिले.

## उष्णतेमुळे शाळा सकाळी ७ ते ११ यावेळेत भरणार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. दि. १८ एप्रिल २०२६ पासून उन्हाळी सुट्टीपर्यंत शाळा सकाळी ७ ते ११ या वेळेत भरतील, असा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांनी दिला आहे.

भारतीय हवामान खात्याने जिल्ह्यासाठी उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी केला आहे. उष्माघाताचे दुष्परिणाम टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत हा आदेश देण्यात आला असून, शाळांनी व्यवस्थापन समितीची मंजुरी घेऊन अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित निर्णयाची माहिती सर्व मुख्याध्यापकांपर्यंत पोहोचविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. शिक्षकांनी परीक्षेचे कामकाज पूर्ण करण्यासाठी सकाळी ७ ते १२ या वेळेत शाळेत उपस्थित राहणे आवश्यक राहील.

## केडगावच्या ओएसीस स्कूलचा 'सीबीएसई'त डंका

**मुलींनी मारली बाजी!**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सेंट्रल बोर्ड ऑफ एज्युकेशन (सीबीएसई) द्वारा घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये केडगाव येथील 'ओएसीस इंग्लिश मीडियम स्कूल'ने यशाची परंपरा कायम राखली असून, शाळेच्या विद्यार्थिनींनी यश मिळवले आहे. कु. अन्विता सुहास घिगे हिने ९४ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. आस्था राहुलकुमार शिंगवी (९३.००%)द्वितीय, तरअक्षरा संजय माळवे (९२.००%) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

आजच्या काळात स्पर्धा परीक्षेसाठी पालकांचा ओढा महागड्या खासगी शिकवणीकडे असतो. मात्र, ओएसीस स्कूलच्या या गुणवंतांनी कुठलीही बाहेरील शिकवणी न लावता, केवळ शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि जिद्दीच्या जोरावर हे घवघवीत यश संपादन केले. त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

निकालाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कु. आस्था शिंगवी हिने इंग्रजी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तर अक्षरा माळवे हिनेही ९९ गुण मिळवत आपले भाषिक प्रभुत्व सिद्ध केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक भानुदास कोतकर, सचिव सचिन कोतकर, संचालिका वैशालीताई कोतकर, प्राचार्या दारकुंडे मॅडम, पर्यवेक्षक शरद पवार आणि सर्व शिक्षक वृंदांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## महिला पदाधिकाऱ्यांचा 'संसद' अभ्यास दौरा; कार्यपद्धतीचा घेतला प्रत्यक्ष अनुभव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** संसदेतील कामकाजाची पद्धत, चर्चेची दिशा आणि विधेयक मंजुरीची प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी पैठण तालुक्यातील महिला पदाधिकाऱ्यांना मिळाली. अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने महिलांनी नवी दिल्ली येथील संसद भवनाला भेट देत संसदीय कार्यपद्धतीचे बारकावे जाणून घेतले. या दौऱ्यात खासदार संदीपान भुमरे यांच्या नेतृत्वाखाली महिला पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी महिलांशी संवाद साधत



लोकप्रतिनिधी म्हणून असलेल्या जबाबदाऱ्या आणि संसदीय परंपरांचे महत्त्व स्पष्ट केले.

महिलांनी संसदेत सुरू असलेल्या कामकाजाचे प्रत्यक्ष निरीक्षण करत विधेयक मंजुरी प्रक्रियेची सविस्तर माहिती घेतली. या अनुभवातून भविष्यातील सामाजिक कार्यासाठी प्रेरणा मिळाल्याची भावना पंचायत समिती सदस्य सखुबाई झारगड यांनी व्यक्त केली.

या अभ्यास दौऱ्यात पंचायत समिती सभापती वैशाली बोंबले, जिल्हाप्रमुख पुष्पा गव्हाणे, तालुकाप्रमुख ज्योती काकडे, पंचायत समिती सदस्य सखुबाई झारगड, अलका शेलके तसेच नगरसेविका वैशाली परदेशी यांचा सहभाग होता. या दौऱ्यामुळे महिलांना राजकीय प्रक्रियेचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाल्याचे सहभागी महिलांनी सांगितले.

# काका ट्रस्ट आयोजित डॉ. कुमार विश्वास यांच्या संगीतमय रामकथेची तयारी पूर्णत्वास

## श्रीराम मंदिराचा भव्य सेट ठरणार प्रमुख आकर्षण



(छाया : सिद्धार्थ दीक्षित)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माजी आमदार स्व.अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ प्रसिद्ध कवी आणि रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांच्या अपने-अपने राम या संगीतमय रामकथेचे आयोजन अहिल्यानगरमध्ये काका ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. उद्या रविवार दिनांक १९ रोजी राम कथेला सुरवात होणार असून मंगळवार दि. २१ पर्यंत दररोज सायंकाळी ६ ते ९ यावेळेत नगर शहरातील आनंदधाम रोड वरील राष्ट्रीय पाठशाळेच्या भव्य प्रांगणात ही संगीतमय रामकथा होणार आहे. शहरातील सर्वात मोठ्या ठरणाऱ्या या धार्मिक सोहळ्याची तयारी पूर्णत्वास आली आहे. या सोहळ्यासाठी परिसरात ठिकठिकाणी स्वागत कमानी उभारण्यात आल्या असल्याने अहिल्यानगर शहर राममय झाले आहे, अशी महिती नगरसेवक विकी जगताप यांनी दिली.

अधिक माहिती देतना इंजिनिअर अनिल मुरकुटे म्हणाले, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप व आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या भव्यदिव्य सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. देशात लोकप्रिय असलेले रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांच्या संगीतमय राम कथेसाठी सुमारे १ लाख स्क्वेअर फुटाचा जर्मन हँगर पद्धतीचा भव्य मंडप उभारण्यात आला असून हजारो भाविकांसाठी खुर्च्यांची आसन व्यवस्था करण्यात आली आहे. कथाकार डॉ. कुमार विश्वास यांच्यासाठी भव्य व आकर्षक व्यासपीठ उभारण्यात आले असून त्यावर श्रीराम मंदिराचा आकर्षक व भव्य सेट उभारण्यात आला आहे. सेटच्या मध्यामाभागी श्रीराम पंचायतनच्या मुर्त्या ठेवण्यात येणार आहेत. उपस्थित सर्व भाविकांना रामकथा व्यवस्थित पाहता व ऐकता येईल अशी उत्तम व्यवस्था करण्यात आली असूनजागोजागी मोठ्या एलईडी स्क्रीन बसवण्यात आल्या आहेत.

अजित जगताप यांनी सांगितले, रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांच्या संगीतमय राम कथेसाठी सर्व भाविकांसाठी मोफत आहे. या सोहळ्यास उपस्थित असलेल्या हजारो भाविकांची तिन्ही दिवस महाप्रसादाची व्यवस्था काका ट्रस्टच्या वतीने करण्यात आली आहे. यासाठी कार्यक्रम स्थळाच्या समोरील भागात वेगळी भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भाविकांच्या दुचाकी व चारचाकी गाड्यांसाठी कार्यक्रम स्थळा जवळील आयटीआय कॉलेजचे मैदान, पॉलिटेक्निक कॉलेज मैदान, रयत शिक्षण संस्थेचे मैदान आनंदधाम शेजारील भक्तनिवास जवळ आदी ठिकाणी सुटसुटीत वाहन तळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

अनुप काळे म्हणाले, प्रख्यात रामकथाकार डॉ.कुमार विश्वास संपर्ण लोकप्रिय असून त्यांनी रामकथेच्या माध्यमातून देशवासीयांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे कुमार विश्वास यांच्या रामकथेच्या अद्भुत अनुभवाची अनोखी पर्वणी नगरकर भाविकांना मिळाली आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

माजी आमदार स्व.अरुण जगताप यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त होणाऱ्या या ऐतिहासिक रामकथा सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी व्हावे व तिन्ही दिवस महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन काका ट्रस्टचे राजेश भंडारी, गणेश गोंडाळ, शशीकांत घीगे आदींनी केले आहे.

# भागवत कथेच्या कार्यक्रमात महिलांच्या गळयातील सोन्याचे दागिने लांबविले

## गंगा उद्यानजवळील कार्यक्रमात घडला प्रकार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पोलिस ठाण्यापासून हकेच्या अंतरावर असलेल्या गंगा उद्यानजवळील भागवत कथेच्या कार्यक्रमातून तीन महिलांच्या गळयातील दागिने चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे महिला वर्गात एकच खळबळ उडाली असून तोफखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीत चोऱ्यांचे सत्र पुन्हा सुरच असल्याचे स्पष्ट होत असून तोफखान्याच्या डिबीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कॉटेज कॉर्नर येथील मयुरबन कॉलनीमध्ये राहणाऱ्या संगिता संजय आगलावे यांच्यासह तीन महिलांच्या गळयतील दागीने चोरीला गेले आहे. गंगा उद्यानजवळ सध्या भागवत कथेचा कार्यक्रम सुरु आहे. या कार्यक्रमासह संगिता आगलावे यांच्यासह संगीला ज्ञानेश्वर साळवे (रा. जे.जे.गल्ली, मंगलेट) व पुष्पा राजकुमार खंडेलवार (रा. कृपाल आश्रमसमोर झालानी हॉस्पिटलजव जवळ) यांच्या गळयतील दगाने चोरीला गेले आहे. यामध्ये संगीता आगलावे यांच्या गळयातील २८ हजार रुपये किमतीचे २ तोळे सोन्याचे दागीने, संगीता साळवे४६ हजार रुपये किमतीचे गंठण व पुष्पा खंडेलवाल यांच्या गळयातील ७८ हजार रुपये किमतीचे गंठण असा ऐवज चोरटयांनी चोरुन नेला आहे. याप्रकरणी संगीता आगलावे यांच्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भांबळ साहेब, जरा चोऱ्यांचा छडा लावा

**तोफखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून चोरटयांच्या घटना वाढू लागल्या असून त्या तूलनेत तपासा प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे डिबीची कार्यक्रमता वाढविणे आवश्यक असून प्रसंगी पोनि भांबळ यांनाही रस्त्यावर उतरण्याची गरजआहे. अन्यथा चोऱ्यांचे सत्र सुरुच राहिल्यास नागरिकांच्या आंदोलनाला तोंड देण्याची वेळ येऊ नये हीच अपेक्षा आहे.**

# दिव्यांग मुलाच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट

## वेदनांतून उभी राहिलेली माणुसकी; गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात ''इतर मुलांमध्येच माझा नचिकेत'' – बाबासाहेब बोडखे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भुईकोट किल्ला परिसरातील पंडित नेहरू हिंदी विद्यालयात एक वेगळाच, हृदयाला स्पर्श करणारा प्रसंग अनुभवायला मिळाला. शिक्षक वडिलांनी आपल्या दिव्यांग मुलाच्या वाढदिवसाला केवळ घरापुरता आनंद न ठेवता, तो समाजासोबत वाटण्याचा निर्णय घेतला आणि त्या भावनेतून अनेक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविले.

शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे यांनी आपल्या दिव्यांग मुलगा नचिकेत बोडखे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व पाण्याच्या बाटल्यांचे वाटप केले. नचिकेतला इतर मुलांप्रमाणे शाळेत जाता येत नाही, ही जाणीव मनाला टोचत असतानाही बोडखे यांनी त्या वेदनेला सकारात्मक रूप देऊन गरजू विद्यार्थ्यांमध्ये आपल्या मुलाचे शिक्षण पाहिले. दरवर्षी ते आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदतीचा उपक्रम राबवत असतात.

कार्यक्रमात नचिकेतच्या हस्तेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. त्या क्षणी उपस्थित प्रत्येकाच्या डोळ्यांत भावना दाटून आल्या, कारण त्या वाटपामागे केवळ वस्तू नव्हत्या, तर एका वडिलांचे प्रेम, वेदना आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी होती. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक सुहास धिवर, बाबासाहेब बोडखे, गोपीचंद परदेशी, कमल भोसले, कविता जोशी, वैभव शिंदे, सुदेश छजलाने, शिल्पा घायतडक, मोनिका मेहतानी, परीक्षित सुने, नूतन गाडे, पिंकी कुलटकर, मोनिका साळुंके, ठाकुरदास परदेशी, योगेश गायकवाड यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाबासाहेब बोडखे म्हणाले की, ''माझा मुलगा नचिकेत त्याला इतर मुलांसारखे शाळेत जाता येत नाही, हे माझ्यासाठी आयुष्यातील सर्वात मोठे दुःख आहे. प्रत्येकवेळी शाळेत जाताना, मुलांना पाहताना मला त्याची आठवण येते मन भरून येते. पण मी ठरवलंही वेदना मला खचवणार नाही, तर समाजासाठी काहीतरी चांगलं करण्याची ताकद देणार. म्हणूनच मी नचिकेतचा वाढदिवस साजरा करताना इतर मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्यासाठी ही सर्व मुलं म्हणजेच माझा नचिकेत आहेत. त्यांच्या डोळ्यातील चमक, त्यांच्या चेहऱ्यावरचं हसूहेच माझ्यासाठी खऱ्या अर्थाने वाढदिवसाचं गिफ्ट आहे. आपण आपल्या मुलांसाठी जगतो, पण समाजासाठीही काहीतरी देणं हे आपलं कर्तव्य आहे.

# करिअरची पळापळ सुखासाठी मात्र परमशांती श्रीकृष्ण नामातच

## वृंदावन निवासी परम श्रध्देय पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांचे प्रतिपादन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अलिकडे करिअरच्या नावाखाली सर्व पळापळ सुखासाठी चालली असली तरी परमशांती भगवान श्रीकृष्णांच्या नामातच मिळते,असा विश्वास वृंदावन निवासी परम श्रध्देय पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांनी व्यक्त केला.

येथील श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकरजी गुप्ता, महेश गुप्ता आणि आयुष गुप्ता यांनी सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे पाचवे पुष्प गुंफताना ते बोलत होते.

सर्वश्री सुधीर झालानी, किसनलाल बंग व प्रदिप पंजाबी यांच्यासह शहरातील मान्यवर प्रतिष्ठित भाविक श्रोत्यांना श्रवणाचा उत्तम आनंद मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत.

पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय पुढे म्हणाले, आपल्याला सुख कशाने मिळेल? याचा विचार करून निर्णय घेतले जातात. पण सुख परमशांतीचा आनंद मिळवून देऊ शकत नाही. त्याकरिता निसर्गरम्य डोंगर परिसरात, नदीच्या किनाऱ्यावर, समुद्राच्या किनाऱ्यावर गेल्यावर मन शांत होते. शांतीत सुख नव्हे तर आनंद असतो. भगवान श्रीकृष्णांच्या लिलांचे स्मरण करत नाम घेत राहिले की, शांतीचा परमानंद मिळतो.

कथा श्रवणाने आपले रूप, स्वरूप, व्यवहार बदलतो. भाव जागृती होते. जीवनातील संकट, विपत्ती, कष्ट, शारिरीक व्यथा, परिवारातील व्दिधावस्था केवळ श्रीकृष्णांच्या स्मरणाने निघून जाते. एकांतात बसून श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी हे नाथ नारायण वासुदेवा...हे भजन म्हणण्यास सुरुवात केली की, सर्व संकटे दूर चालल्याचे जाणवते. कृष्णलिलांचे चिंतन डोळे बंद करून करावे, श्रीकृष्ण सोबत असल्याचे अनुभवता येते.

वयाच्या ७ वर्षात करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलण्याची लिला श्रीकृष्णाने करून दाखवताना त्याचे श्रेय मात्र ब्रजवासींना दिले. इतरांना मान-सन्मान-श्रेय देणे हा श्रीकृष्णांचा स्वभावच आहे. आपण दुसऱ्यांचा मान, श्रेय हिसकावून घेतो. कृष्ण भक्त बनण्याची इच्छा असल्यास आपला मान-श्रेय इतरांना देणे शिकले पाहिजे.

आज भारताला निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, तुकाराम, सुरदास, नामदेव यांची गरज आहे. शुध्द आचरण असलेल्या माता-पित्याच्या पोटी भक्त जन्म घेतात. भक्तीचा प्रवाह खळाळता ठेवण्याचे मौलिक कार्य भक्त करतात. गोवर्धन पूजा, रास लिला यांचे वैशिष्ट्य समजावून घेताना उपस्थित सर्वच श्रीकृष्णमय झालेले दिसत होते.

# २१ एप्रिलच्या संपात शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होणार - शिवाजी खांडेकर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य सहकारी नीम सहकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती महाराष्ट्र यांच्या वतीने २१ एप्रिल २०२६ पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे या संपामध्ये शिक्षकेतर कर्मचारी आपल्या न्याय मागण्यासाठी सहभागी होणार आहेत यामध्ये प्रामुख्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या - १) १०:२०:३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षकेतर कर्मचार्यांना लागू करण्यात यावा. २) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सेवेत असताना डीएड बीएड ही पदवी धारण केलेली असताना त्यांना विनाअट शिक्षक पदावर पदोन्नती देणे. ३) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बंद असलेली पद भरती सुरु करणे. ४) अनुकंपा नियुक्ती होईल कर्मचाऱ्यांना मान्यता तसेच शालार्थ आयडी मंजूर करणे. ५) चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची पद भरती सुरु करणे. ६) दि. ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना अनुदान, अंशत: अनुदानावर नियुक्त तसेच २००५ नंतर १००% अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचार्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. या संपामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळ सहभागी होणार आहे अशी माहिती सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांनी दिली.

# समता आणि सामाजिक न्यायासाठी संघटित प्रयत्नांची गरज – ना. छगन भुजबळ

## अहिल्यानगरात छगन भुजबळ यांचे समता परिषदेच्या वतीने स्वागत; भरत गारुडकर यांना राज्य पातळीवरील जबाबदारीचे संकेत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या अहिल्यानगर शहरातील आगमनावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष भरत गारुडकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या प्रसंगी राज्य उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, माजी महापौर भगवानराव फुलसुंदर, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार यांच्यासह समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, महानगर अध्यक्ष ब्रिजेश ताठे, कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे ,प्रकाश इवळे , डॉ नागेश गवळी यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भरत गारुडकर यांनी समता परिषदेच्या विविध उपक्रमांबाबत छगन भुजबळ यांच्याशी चर्चा केली.

या भेटीत बोलताना छगन भुजबळ यांनी समता परिषद ही समाजातील वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी लढणारी एक प्रभावी संघटना असल्याचे नमूद केले. त्यांनी सांगितले की, ''महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या काळात अधिक गरज आहे. शिक्षण, समानता आणि सामाजिक न्याय या त्रिसूत्रीवर समाज उभा राहू शकतो. समता परिषदेच्या माध्यमातून हे कार्य प्रभावीपणे सुरू आहे. कार्यकर्त्यांनी संघटित राहून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले पाहिजे. शासनही अशा सकारात्मक कार्यांना नेहमीच पाठिंबा देईल.'' त्यांनी पुढे सांगितले की, ग्रामीण व शहरी भागातील तफावत कमी करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे आणि समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणणे हीच खरी प्रगती आहे.

भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाज परिवर्तनासाठी असले पाहिजे.

# न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगरमध्ये 'विविध गुणदर्शन' सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील न्यूलॉ कॉलेज, अहिल्यानगरमध्ये विद्यार्थ्यांचा 'विविध गुणदर्शन' सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. संपूर्ण सप्ताहभर विविध उपक्रम, पारंपरिक दिवस आणि स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या कला आणि कौशल्यांचे प्रभावी प्रदर्शन केले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, एकांकिका, नाटक आदी कलाप्रकार सादर करताना सामाजिक भान आणि कायदेविषयक जागरूकता यांचा प्रभावी संदेश दिला. प्रेक्षकांनीही या सादरीकरणांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सांस्कृतिक सप्ताहात ट्रॅडिशनल डे, साडी-जीन्स डे, मिसमॅच डे, बॉलीवूड डे अशा विविध थीम डेचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच लिंबू-चमचा, संगीत खुर्ची, पोत्यातून चालणे, क्रिकेट आदी खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आपले कौशल्य सिद्ध केले. रांगोळी व मेहंदी स्पर्धांमधून भारतीय संस्कृतीचे सुंदर दर्शन घडले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. ज्येष्ठ रंगकर्मी शाम शिंदे, प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, अधीक्षक हेमा कदम तसेच प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.

स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. बी. डी. पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वंदना शिरसाट, प्रा. सुहास तोरडमल, प्रा. माऊली मोरे, रियाज शेख, उदय चौधरी, किशोर चक्रनारायण आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. संपदा लांडगे व कु. रसिका गवळी यांनी केले. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केवळ मनोरंजनच नव्हे तर सामाजिक जाणीवेचे भानही प्रेक्षकांमध्ये निर्माण केले.

# मंथन परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचे १२४ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

## ओजस्वी भोरे व आयुष गंभीरे राज्यात द्वितीय, तर आस्था सुंबे पाचव्या स्थानी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेने राज्यस्तरीय मंथन परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची छाप उमटवली आहे. शाळेतील तब्बल १२४ विद्यार्थ्यांनी विविध स्तरांवरील गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.

यामध्ये ३ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत, ३२ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत, तर ८९ विद्यार्थ्यांनी केंद्र गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत इयत्ता दुसरीतील ओजस्वी स्वप्निल भोरे व आयुष योगेश गंभीरे यांनी द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच इयत्ता चौथीतील आस्था निलेश सुंबे हिने राज्यात पाचवा क्रमांक पटकावत शाळेचा गौरव वाढविला आहे.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा स्कूल कमिटी सदस्य अर्जुनराव पोकळे व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांच्या हस्ते शाळेत विशेष सत्कार करून गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहविभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे, संस्थेचे लाइफ मेंबर सदस्य शिवाजीराव लंके, प्राचार्य छायाताई काकडे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्यासह पालक संघ व शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# भरधाव वेगाने जाणाऱ्या स्कुल बसवर कारवाई करावी

## सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरात पाईप लाईन रोड, गुलमोहर रोड, तपोवन रोड व कुष्टधाम रोड या मुख्य रस्त्यावरून रोज स्कुल बसेस इतक्या वेगाने धावतात कि रस्त्याच्या मधी कोणी आडवे येईल याचे भानही नसते या मुळे नक्कीच मोठा अपघात होण्यापूर्वीच वाहतूक शाखेने या बसेस वर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी केली आहे.

सावेडी उपनगरामध्ये मोठी लोकवस्ती असून या भागामध्ये अनेक शाळकरी मुले बसने शाळेला जात असतात तर काही मुले पायी, सायकल, टू व्हीलरनेही जातात. अश्या परिस्थिती मध्ये शाळकरी मुलांना ने आण करण्यासाठी पोतदार हायस्कुल,आयकोन स्कुल, माऊंट लिटेरा स्कुल,ओर्चीड स्कुल,सेक्रेटहार्ट हायस्कुल, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कुल,हार्मोनि स्कुल,श्री साई इंग्लिश मेडीयम स्कुल व डिवाईन ग्रेस अश्या शाळांचे बसेस या भागातून येजा करतांना दिसतात पण या पैकी काही बसेस इतक्या भरधाव वेगाने व वाहतुकीचे कोणत्याही नियमांचे पालन न करता धावतात कि, बस कोणत्या शाळेची आहे हेही दिसत नाही, वेगाने गेल्यामुळे रस्त्यावर सकाळी चालणाऱ्या जेष्ठ नागरिक पदचारी यांना धुळीचा त्रास सहन करावा लागतोय तसेच लहान मुले सायकल, टू व्हीलर शाळेत जाणाऱ्या मुलांनाही धोका आहे. या पूर्वी या भागात छोटे मोठे अपघात झालेले आहेत तर काहींना प्राण ही गमवावा लागला.

अशी परिस्थिती असतांना पुन्हा या रस्त्यावरून जी बसेस भरधाव वेगाने जातात त्यांच्यावर कायदेशीर कारवाई जर झाली नाही तर नक्कीच मोठे अपघात घडल्याशिवाय राहणार नाही, यासाठी प्रशासनाने व वाहतूक शाखेने कोणतेही मोठे अपघात होण्याची अगर कोणाचे जीवितहानी होण्याची वाट न पाहता त्वरित कायदेशीर करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी केली.